# जाहीर नोटीस (१)

सर्व संबंधितांना या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की , खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील रस्त्याने बाधित क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधिताकडून खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधितानी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

उपरोक्त मिळकतीवर वरील जमीन मालकांशिवाय अन्य कोणचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत उपसंचालक नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधितांने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका तर्फे सदर जमीनीचा मोबदला खाजगी वाटाघाटीने मोबदल्याच्या स्वरूपात वरील जमीन मालकास अदा केला जाईल व जमीन महापालिका ताब्यात घेईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट – १

मिळकतीचे वर्णन – तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली, येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे वाकड येथील स.नं. २३९/२, सि.स.नं. ७२० पै., श्री. प्रविण हरीभाऊ कुंजीर यांच्या मालकीच्या मिळकतीतील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेतील तथापि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेमध्ये समाविष्ट करणेत आलेल्या क्षेत्रातील २४.०० मी. रूंद रस्त्याचे बाधित अंदाजे क्षेत्र २५०.०० चौ.मी. जमीन त्यास चतु:सिमा खालीलप्रमाणे

चतु:सिमा:-

| | |
|---|---|
| उत्तरेस - | लागु स.नं. १९३ पैकी,( सि.स.नं. ७१९) पैकीची मिळकत. |
| दक्षिणेस - | लागु स.नं. २३९ पैकी,( सि.स.नं. ७२०) पैकीची मिळकत. |
| पूर्वेस - | लागु स.नं. २३९ पैकी,( सि.स.नं. ७२०) पैकीची मिळकत. |
| पश्चिमेस - | लागु सि.स.नं. ३१२ पैकीची मिळकत |

परिशिष्ट – २)

मिळकतीचे वर्णन – तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली, येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे वाकड येथील स.नं. १२३/२/२/३,१३०/१, १३०/१ब/१ पैकी मधील पाषाणकर ॲटो व्हील्स प्रा.लि. तर्फे भागीदार श्री.गौतम विश्वानंद पाषाणकर यांच्या मालकीच्या मिळकतीतील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेतील तथापि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेमध्ये समाविष्ट करणेत आलेल्या क्षेत्रातील ४५.०० मी. व १२ मी. रूंद रस्त्याचे बाधित अंदाजे क्षेत्र १२७५.०० चौ.मी. जमीन त्यास चतु:सिमा खालीलप्रमाणे –

मौजे वाकड येथील स.नं. १३०/१ब पैकी मधील १२ मी. रूंद रस्त्याचे बाधित क्षेत्र ३९१.४२ चौ.मी.

चतु:सिमा:-

उत्तरेस - लागु राष्ट्रीय महामार्ग
दक्षिणेस - लागु स.नं. १३० पैकीची अर्जदाराची उर्वरित मिळकत.
पूर्वेस - लागु स.नं. १३० पैकीची मिळकत.
पश्चिमेस - लागु स.नं. १३०/२ पैकीची मिळकत

मौजे वाकड येथील स.नं. १२३/२/२/३ पैकी मधील ४५ मी. रूंद रस्त्याचे बाधित क्षेत्र २७५.०० चौ.मी.

चतुःसिमाः-
उत्तरेस - लागु स.नं. १२३ पैकीची मिळकत.
दक्षिणेस - लागु स.नं. १३० पैकीची निवासी मिळकत.
पूर्वेस - लागु स.नं. १२३ पैकीची मिळकत.
पश्चिमेस - लागु स.नं. १२३ पैकीची मिळकत.

मौजे वाकड येथील स.नं. १३० पैकी मधील ४५ मी. रूंद रस्त्याचे गोलाईने बाधित क्षेत्र ६०८.५८ चौ.मी.

चतुःसिमाः-
उत्तरेस - लागु रस्ता
दक्षिणेस - लागु स.नं. १३० पैकीची अर्जदाराची उर्वरित निवासी मिळकत.
पूर्वेस - लागु स.नं. १३० पैकीची मिळकत.
पश्चिमेस - लागु स.नं. १३० पैकीची मिळकत.

## जाहीर नोटीस (२)

संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले सर्व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर योजनेतील आरक्षणाने/रस्त्याने बाधीत क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या ( टि.डी. आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्बेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी,लीज लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे ४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधीताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे. असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका जमिन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टि डी आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **मौजे रावेत येथील स. नं. ७८ पै. मधील मे बी. व्ही जी डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री बिभीषण व्यंकटराव गायकवाड व श्री. बाळासाहेब व्यंकटराव गायकवाड यांचे** मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्र मंजूर विकास योजनेतील २४.०० मी. **रस्ता बाधित १६३१.२६ चौ.मी. व १८.०० मी. रस्ता बाधित २५.४९ चौ.मी. असे १६५६.७५ चौ मी मधील** जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

**मौजे रावेत येथील स. नं. ७८ पै, ( एकूण बाधित क्षेत्र १६५६.७५ चौ.मी ) २४.०० मी रस्त्याने बाधित क्षेत्राच्या** चतु:सिमा (बाधित क्षेत्र १६३१.२६ चौ. मी.)

उत्तरेस :- स.नं. ७७ पै. मिळकत

पुर्वेस :- स.नं. ७८ पै. मिळकत

दक्षिणेस :- स.नं. ७८ पै. मिळकत

पश्चिमेस :- स.नं. ७८ पै. मिळकत

१८.०० मी रस्त्याने बाधित क्षेत्राच्या चतु:सिमा (बाधित क्षेत्र २४.४९ चौ. मी.)

उत्तरेस :- स.नं. ७८ पै. मिळकत

पुर्वेस :- स.नं. ७८ पै. मिळकत

दक्षिणेस :- स.नं. ८६ पै. मिळकत

पश्चिमेस :- स.नं. ७८ पै. मिळकत

परिशिष्ट २)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **मौजे पिंपळे सौदागर** येथील स.नं. २२/९ पै., सि.स.नं. ५०८ पै., ५०९ पै. मधील श्री. राहूल निलकंठ सुर्यवंशी यांचे मिळकती मधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील १२मी. व १८ मी. रस्त्याने बाधित क्षेत्र २०६.५० चौ.मी. जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

पुर्व - स.नं. २२ पैकी, सि.स.नं. ५०८ पैकी ची मिळकत.

पश्चिम - स.नं. २२ पैकी, सि.स.नं. ५०९ पैकी ची मिळकत

उत्तर - स.नं. २२ पैकी, सि.स.नं ५०८ व ५०९पैकी ची मिळकत.

दक्षिण - स.नं. २२ पैकी, सि.स.नं. ५०८ पैकी ची मिळकत

परिशिष्ट ३)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे बोपखेल येथील स.नं १५६, हिस्सा नं ४ब/१ पै मधील मे. फॉर्चुन प्रॉपर्टीज तर्फे भागीदार श्री. सोमनाथ सुरेश गोगावले, श्री. दत्तात्रय आनंदा घुले, श्री. सागर सुरेश फुगे, श्री. अभिजित पांडुरंग गावडे यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्र मंजूर विकास योजनेतील १२ मी रस्त्याने बाधित क्षेत्र ५४०.५० चौ.मी , जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

मौजे बोपखेल स.नं १५६/४ब/१ मधील १२ मी रस्त्याची चतु:सिमा:( बाधित क्षेत्र ५४०.५० चौ.मी )

उत्तरेस :- स.नं. १५६ पैकीची मिळकत

पुर्वेस :- स.नं. १५६ पैकीची अर्जदाराची उर्वरित मिळकत

दक्षिणेस :- स.नं. १५६ पैकीची मिळकत

पश्चिमेस :- संरक्षण विभागाची हद्द व स.नं. १५६ पै. मिळकत

जाहिरात क्रमांक २९
दिनांक २८।६।१८

उपसंचालक,
नगररचना व विकास विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी पुणे ४११०१८

सदरची जाहीर नोटीस पिंपरी चिचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.